TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालयः- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे-४०११०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८/२८९३०२८
ई-मेल: publichealth@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## सार्वजनिक आरोग्य विभाग

जा.क्र.मनपा/सार्व.आ.वि./ 223 /२०२५-२६ दिनांकः- 28/04/२०२५.

प्रति,
सिस्टीम मॅनेजर,
माहिती व तंत्रज्ञान विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जाहीर पदभरती सूचना प्रसिध्द करणे बाबत...

मिरा भाईंदर महानरपालिका, सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे राष्ट्रीय आरोग्य अभियान, राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम. १५ वा वित्त आयोग, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना अंतर्गत वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी रिक्तपदांची पदभरती करीता इच्छुक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

तरी सदर जाहीर सूचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

(डॉ. प्रमोद पडवळ)
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

**सोबत : जाहिरातीच्या मसुद्याची प्रत जोडली आहे.**

TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालय:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे-४०११०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८/२८९३०२८
ई-मेल: publichealth@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## सार्वजनिक आरोग्य विभाग

**जा.क्र.मनपा/सार्व.आ.वि./ 229 /२०२५-२६** **दिनांक:- 28/07/२०२५.**

### // जाहीर सूचना//

**राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM), राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम (NTEP), १५वा वित्त आयोग (नागरी आयुष्यामन आरोग्य मंदिर) व हिंदु ह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना अंतर्गत ठोक मानधनावरील रिक्त पदे भरणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM), राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम (NTEP), 15 वा वित्त आयोग (नागरी आयुष्यामन आरोग्य मंदिर) व हिंदु ह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना अंतर्गत करारतत्वावर ठोक मानधनावर खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे रिक्त पदे भरण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांची निवड करणेकामी अर्ज करण्यासाठी कळविण्यात येत आहे. जाहिरातीत पदापुढे नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या तसेच इतर अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी, विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या गुणपत्रके व प्रमाणपत्रांच्या स्व-साक्षांकित प्रतींसह दि. २९/०७/२०२५ ते दि.२०/०८/२०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत सार्वजनिक आरोग्य विभाग, **डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, मांडली तलाव, तळ मजला, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे**-४०११०१ येथे अर्ज सादर करावेत.

राखीव प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतर प्रवर्गातील उमेदवारांना तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल, त्यामुळे सर्व प्रवर्गातील पात्र उमेदवारांनी अर्ज सादर करावेत. पोस्टाने/टपालाने अर्ज स्वीकारण्यात येतील. शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही अर्ज स्वीकारण्यात येतील. मात्र विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत किंवा प्राप्त होणाऱ्या अर्जांचा भरती प्रकियेसाठी विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरकामीची सविस्तर जाहीर सूचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या https://www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

अर्ज स्वीकारण्याचा पत्ता: **सार्वजनिक आरोग्य विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, मांडली तलाव, तळ मजला, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे**-४०११०१.

**(डॉ. प्रमोद पडवळ)**
**वैद्यकीय आरोग्य अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

## १. राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) पदभरती – (पदांचा अनु.क्र. ०१ ते १२)

| अ. क्र. | पदाचे नाव | वय | रिक्त पदांची संख्या | प्रवर्ग | प्रवर्ग निहाय पद संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | आवश्यक अनुभव | ठोक मानधन (प्रतिमहा) (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | क्षकिरण तज्ज्ञ Radiologist | उच्चतम मर्यादा ६९ वर्षे | १ | खुला | १ | MD Radiology/ DMRD | Preference will be given to experienced person | ७५,०००/- |
| २ | बालरोग तज्ज्ञ Paediatrician | | १ | खुला | १ | MD Paed/DCH/DNB | Preference will be given to experienced person | ७५,०००/- |
| ३ | सुक्ष्मजीव शास्त्रज्ञ Microbiologist (MD) | | १ | खुला | १ | MD Microbioloy | Preference will be given to experienced person | ७५,०००/- |
| ४ | पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी वैद्यकीय अधिकारी | | १२ | अ. जा. | १ | MBBS with MCI registration/ MMC registration | Preference will be given to experienced person | ६०,०००/- |
| | | | | अ. ज. | १ | | | |
| | | | | वि जा. (अ) | १ | | | |
| | | | | भ. ज. (ब) | १ | | | |
| | | | | इ. मा. व. | ३ | | | |
| | | | | सा. शै. मा.प्र | २ | | | |
| | | | | आ. दु. घ. | १ | | | |
| | | | | खुला | २ | | | |
| ५ | साथरोग तज्ज्ञ Epidemiologist | खुल्या प्रवर्गासाठी १८ ते ३८ वर्षे, राखीव प्रवर्गासाठी १८ ते ४३ वर्षे वयोगट | १ | खुला | १ | Any medical graduate with MPH/MHA/ MBA in Health | Preference will be given to experienced person | ३५,०००/- |
| ६ | दंतशल्य चिकित्सक Dentist | | १ | खुला | १ | BDS with २ years Expericence Or MDS (without Expericence) with Maharashtra State Dental Council registration | २ years Expericence for BDS. | ३०,०००/- |

| अ. क्र. | पदाचे नाव | वय | रिक्त पदांची संख्या | प्रवर्ग | प्रवर्ग निहाय पद संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | आवश्यक अनुभव | ठोक मानधन (प्रतिमहा) (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापक | खुल्या प्रवर्गासाठी १८ ते ३८ वर्षे, राखीव प्रवर्गासाठी १८ ते ४३ वर्षे वयोगट | २ | अ. जा. | १ | M.B.B.S or Graduate in Health Sciences (B.D.S/B.A.M.S/ B.H.M.S/B.U.M. S/B.P.Th /Nursing Basic/(P.B.Bsc)/ B.Pharm/+ MPH/MHA/MBA in Health Care Adminstration | Preference will be given to experienced person | ३२,०००/- |
| | | | | खुला | १ | | | |
| ८ | परिचारिका (महिला) | खुल्या प्रवर्गासाठी १८ ते ३८ वर्षे, राखीव प्रवर्गासाठी १८ ते ४३ वर्षे वयोगट | ६ | वि जा. (अ) | १ | B.sc Nursing / GNM with MNC Registration. | Preference will be given to experienced person | २०,०००/- |
| | | | | सा. शै. मा.प्र | ३ | | | |
| | | | | आ. दु. घ. | २ | | | |
| ९ | परिचारिका (पुरुष) | खुल्या प्रवर्गासाठी १८ ते ३८ वर्षे, राखीव प्रवर्गासाठी १८ ते ४३ वर्षे वयोगट | २ | अ. जा. | १ | B.sc Nursing / GNM with MNC Registration. | Preference will be given to experienced person | २०,०००/- |
| | | | | वि जा. (अ) | १ | | | |
| १० | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | खुल्या प्रवर्गासाठी १८ ते ३८ वर्षे, राखीव प्रवर्गासाठी १८ ते ४३ वर्षे वयोगट | ४ | अ. ज. | १ | B.sc with D.M.L.T. & paramedical council registration | Preference will be given to experienced person | १७,०००/- |
| | | | | भ. ज. (ब) | १ | | | |
| | | | | इ. मा. व. | १ | | | |
| | | | | सा. शै. मा.प्र | १ | | | |
| ११ | औषध निर्माता | खुल्या प्रवर्गासाठी १८ ते ३८ वर्षे, राखीव प्रवर्गासाठी १८ ते ४३ वर्षे वयोगट | २ | इ. मा. व. | १ | D. Pharma with MPC | Preference will be given to experienced person | १७,०००/- |
| | | | | सा. शै. मा.प्र | १ | | | |
| १२ | प्रसविका | खुल्या प्रवर्गासाठी १८ ते ३८ वर्षे, राखीव प्रवर्गासाठी १८ ते ४३ वर्षे वयोगट | ६ | वि.मा.प्र. | १ | ANM with MNC Registration. | Preference will be given to experienced person | १८,०००/- |
| | | | | सा. शै. मा.प्र | ४ | | | |
| | | | | आ. दु. घ. | १ | | | |

## २. राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम (NTEP) पदभरती – (पदांचा अनु.क्र. ०१ ते ०३)

| अ. क्र. | पदाचे नाव | वय | रिक्त पदांची संख्या | प्रवर्ग | प्रवर्ग निहाय पद संख्या | आवश्यक शौक्षणिक अर्हता | प्राधान्य पात्रता | ठोक मानधन (प्रतिमहा) (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | औषध निर्माण अधिकारी | खुल्या प्रवर्गासाठी १८ ते ३८ वर्षे, राखीव प्रवर्गासाठी १८ ते ४३ वर्षे वयोगट | १ | खुला | १ | Degree/ Diploma in Pharmacy from a recognized university with MPC Registration | One year experience in managing drug store in a reputed hospital/ health centre recognized by govt candidate should be well conversant with various computer programming including MS, Word, and Excel &simples statistical packages. | १७,०००/- |
| २ | वरिष्ठ क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक | | १ | अ.ज. | १ | १. Graduate or Diploma in Medical Laboratory technology or equivalent from a govt recognized institution<br>२. Permanent two wheeler driving license & should be able to drive two wheeler<br>३. Certificate course in computer operations (minimum two months)<br>४. Paramedical Council Registration | Minimum one year of experience in NTEP | २०,०००/- |
| ३ | क्षयरोग आरोग्य कार्यकर्ता | | १ | सा.शै.मा.प्र. | १ | १. Graduate in science<br>OR<br>२. Intermediate (१०+२) in science and experience of Working as MPW/LHV/ANM/Health Worker/Certificate or higher course in Health Education/Counselling<br>OR<br>३. Tuberculosis health visitor's recognized course<br>४. Certificate course in computer operations (minimum two months) | Training course for MPW orrecognized sanitary inspector's course | १५,५००/- |

### ३. १५ वा वित्त आयोग (नागरी आयुष्यमान आरोग्य मंदिर) (१५ FC UAAM) पदभरती – (पदांचा अनु.क्र. ०१ ते ०४)

| अ. क्र. | पदाचे नाव | वय | रिक्त पदांची संख्या | प्रवर्ग | प्रवर्ग निहाय पद संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | प्राधान्य पात्रता | ठोक मानधन (प्रतिमहा) (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी वैद्यकीय अधिकारी | उच्चतम मर्यादा ६९ वर्षे | २१ | अ. जा. | ३ | MBBS with MCI registration/ MMC registration | Preference will be given to experienced person | ६०,०००/- |
| | | | | अ. ज. | २ | | | |
| | | | | वि जा. (अ) | १ | | | |
| | | | | भ. ज. (ब) | १ | | | |
| | | | | भ. ज. (क) | १ | | | |
| | | | | भ. ज. (ड) | १ | | | |
| | | | | वि. मा. प्र. | १ | | | |
| | | | | इ. मा. व. | ४ | | | |
| | | | | सा. शै. मा.प्र. | ३ | | | |
| | | | | आ. दु. घ. | ३ | | | |
| | | | | खुला | १ | | | |
| २ | परिचारिका (महिला) | खुल्या प्रवर्गासाठी १८ ते ३८ वर्षे, राखीव प्रवर्गासाठी १८ ते ४३ वर्षे वयोगट | २३ | अ. जा. | १ | B.sc Nursing / GNM with MNC Registration. | Preference will be given to experienced person | २०,०००/- |
| | | | | वि जा. (अ) | १ | | | |
| | | | | भ. ज. (ब) | १ | | | |
| | | | | भ. ज. (क) | १ | | | |
| | | | | भ. ज. (ड) | १ | | | |
| | | | | वि. मा. प्र. | १ | | | |
| | | | | इ. मा. व. | ६ | | | |
| | | | | सा. शै. मा.प्र. | ३ | | | |
| | | | | आ. दु. घ. | ३ | | | |
| | | | | खुला | ५ | | | |
| ३ | परिचारिका (पुरुष) | | ३ | अ. जा. | १ | B.sc Nursing / GNM with MNC Registration. | Preference will be given to experienced person | २०,०००/- |
| | | | | वि जा. (अ) | १ | | | |
| | | | | खुला | १ | | | |
| ४ | MPW (male) | | ३१ | अ. जा. | ४ | १२th pass in science + Paramedical Basic Training Course **OR** Sanitary Inspector Course | Preference will be given to experienced person | १८,०००/- |
| | | | | अ. ज. | २ | | | |
| | | | | वि जा. (अ) | १ | | | |
| | | | | भ. ज. (क) | १ | | | |
| | | | | भ. ज. (ड) | १ | | | |
| | | | | वि. मा. प्र. | १ | | | |
| | | | | इ. मा. व. | ६ | | | |
| | | | | सा. शै. मा.प्र. | ३ | | | |
| | | | | आ. दु. घ. | ३ | | | |
| | | | | खुला | ९ | | | |

## ४. हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना (HBT) (पदांचा अनु.क्र. ०१ ते ०४)

| अ. क्र. | पदाचे नाव | वय | रिक्त पदांची संख्या | प्रवर्ग | प्रवर्ग निहाय पद संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | प्राधान्य पात्रता | ठोक मानधन. (प्रतिमहा) (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी वैद्यकीय अधिकारी | उच्चतम मर्यादा ६९ वर्षे | ३ | अ. जा. | १ | MBBS with MCI registration/MMC registration | Preference will be given to experienced person | ६०,०००/- |
| | | | | वि जा. (अ) | १ | | | |
| | | | | खुला | १ | | | |
| २ | परिचारिका (महिला) | खुल्या प्रवर्गासाठी १८ ते ३८ वर्षे, राखीव प्रवर्गासाठी १८ ते ४३ वर्षे वयोगट | ३ | अ. जा. | १ | B.sc Nursing / GNM with MNC Registration. | Preference will be given to experienced person | २०,०००/- |
| | | | | वि जा. (अ) | १ | | | |
| | | | | खुला | १ | | | |
| ३ | MPW (male) | | ३ | अ. जा. | १ | १२th pass in science + Paramedical Basic Training Course OR Sanitary Inspector Course | Preference will be given to experienced person | १८,०००/- |
| | | | | वि जा. (अ) | १ | | | |
| | | | | खुला | १ | | | |

**राष्ट्रीय आरोग्य अभियान, राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम, 15 वा वित्त आयोग (नागरी आयुष्यामन आरोग्य मंदिर) व हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना कंत्राटी पदभरती मार्गदर्शक सूचना - २०२५-२६**

**राष्ट्रीय आरोग्य अभियान,** राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम, 15 वा वित्त आयोग (नागरी आयुष्यामन आरोग्य मंदिर) व हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना अंतर्गत प्रकल्प/कार्यक्रम अंमलबजावणी आराखड्यानुसार मंजूर कंत्राटी पदांपैकी रिक्त पदे भरण्याकरिता विविध कार्यक्रमांमधील रिक्त पदांची जाहिरात https://www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे, अर्ज करावयाच्या पध्दतीबाबत सर्वसाधारण सुचना/माहिती पुढीलप्रमाणे आहेत. सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करून अर्ज विहित केलेल्या पध्दतीनुसारच सादर करावा. अर्जामध्ये दिलेली माहिती व कागदपत्रे यांच्या आधारे उमेदवाराची पात्रता/अपात्रता तपासण्यात येईल व त्या आधारे त्याचा समावेश पुढील निवड प्रक्रियेत करण्यात येईल. तथापि, अर्ज स्वीकारण्यात आला किंवा पुढील निवड प्रक्रियेत समावेश करण्यात आला म्हणजे उमेदवार त्या कंत्राटी पदाकरीता पात्र आहे असा अर्थ होणार नाही. निवड प्रक्रियेदरम्यान कोणत्याही वेळी किंवा निवडीनंतर अर्जदार विहित अर्हता धारण करीत नसल्याचे किंवा कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवाराची उमेदवारी या निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

१) दिलेल्या नमुन्यामध्ये अर्ज उमेदवारांने सादर करणे बंधनकारक राहील, नमुन्यात अर्ज सादर केला नसल्यास अर्ज अपात्र करण्यात येईल.

२) **शैक्षणिक/तांत्रिक/व्यावसायिक अभ्यासक्रम माहिती तपशील-**

अर्जदाराने सर्व शैक्षणिक/तांत्रिक/व्यावसायिक अभ्यासक्रम इत्यादीची माहिती अर्जासोबत स्वसाक्षांकित छायांकित कागदपत्रे जोडावीत.

I. शैक्षणिक अर्हतेबाबतचा सविस्तर व अचूक तपशील अर्जात नोंद करावा,

II. अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेस उमेदवाराकडे पदाकरीता आवश्यक किमान शैक्षणिक पात्रता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

III. आवश्यक शैक्षणिक अर्हता ज्या तारखेस प्राप्त केली आहे ती तारीख अर्जात नमूद करणे आवश्यक आहे. (निकाल घोषीत केल्याचा दिनांक)

IV. **अंतिम वर्षाच्या प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्यास संबंधित संस्थेकडून त्याचे गुणांमध्ये रूपांतर करून ते प्रमाणित करून घ्यावे व त्याची प्रत अर्जासोबत जोडावी त्यानुसार अर्जात गुणांची टक्केवारी नमूद करावी व आपण निवडीस पात्र झाल्यास छाननी दरम्यान मूळ प्रत सादर करावी.**

V. शैक्षणिक प्रमाणपत्रात नमूद गुणांची टक्केवारी व अर्जात नमुद टक्केवारी न जुळल्यास असे अर्ज नामंजूर करण्यात येतील.

VI. अर्जात नमूद केलेल्या सर्व शैक्षणिक अर्हतेबाबतची स्वयंसाक्षांकित केलेले छायांकित प्रमाणपत्रे/कागदपत्रे अर्जासोबत सादर करावी व आपण निवडीस पात्र झाल्यास छाननी दरम्यान मूळ कागदपत्रे सादर करणे अनिवार्य राहील. निवड प्रक्रियेच्या छाननी दरम्यान आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या गुणपत्रिका व अर्जामध्ये नमूद केलेली माहिती न जुळल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

VII. कंत्राटी पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही "विद्यापीठ अनुदान आयोग" (UGC Approved) मान्यताप्राप्त विद्यापीठातूनच प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे. अशाच विद्यापीठातून घेतलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता ग्राह्य धरण्यात येईल.

VIII. ज्या वैद्यकीय/निमवैद्यकीय पदांकरिता संबंधित वैद्यकीय/निमवैद्यकीय परिषदेची नोंदणी अनिवार्य आहे. अशा अर्जदारांनी संबंधित परिषदेकडे नोंदणी केलेले प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे व आपण निवडीस पात्र झाल्यास छाननी दरम्यान सादर करणे आवश्यक आहे.

३) **अनुभवाचा तपशील** - अर्जदाराने सर्व अनुभवांचा तपशील अर्जासोबत नोंदवावा.

I. अर्ज करीत असलेल्या कंत्राटी पदाकरीता विहित केलेली शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचाच अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्यानुसार शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करण्यात येऊ नये. त्या अनुभवाची दखल घेतली जाणार नाही.

II. अर्जामध्ये अनुभवाचा तपशील नमूद करताना सध्याचा नियुक्ती कालावधी ते पहिली नियुक्ती कालावधी या क्रमानेच नमूद करावे.

III. अनुभवाचा तपशील नमूद करीत असताना ज्या कार्यालयाचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त आहे, अशाच कार्यालयाचा तपशील अर्जामध्ये नमूद करावा, अनुभव प्रमाणपत्र नसल्यास सदरचा अनुभव ग्राह्य धरण्यात येणार नाही. अनुभव प्रमाणपत्रामध्ये अनुभवाचा कालावधी सुस्पष्टपणे नमूद असावा.

IV. अनुभवाचा तपशील नमूद करताना रुजू दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. दोनही तारखा अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास अशा अनुभवाचा विचार करण्यात येणार नाही. (अनुभव नोंदविताना वर्ष/महिने/दिवस/ YY-MM-DD याप्रमाणे नोंदवावा.)

V. ज्या कंत्राटी पदाकरीता अर्ज केला आहे, त्या पदाशी संबंधित असलेला अनुभवच ग्राह्य धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

**४) कोणत्या पदांसाठी अर्ज करावयाचा आहे?**

अर्जदार एकापेक्षा जास्त पदांना अर्ज करू शकेल. परंतु प्रत्येक पदाकरिता अर्जदारास स्वतंत्र अर्ज करणे बंधनकारक राहील, प्रत्येक अर्जासोबत आवश्यक सर्व कागदपत्रे/प्रमाणपत्रे जोडणे बंधनकारक राहील. एकाच अर्जात विविध कार्यक्रम/पद नमुद केल्यास तो अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

**५) कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर करणे-**

अर्जदाराने अर्जामध्ये नोंदविलेल्या माहितीसंबंधीचे सर्व कागदपत्रे आणि प्रमाणपत्रे तसेच शैक्षणिक अर्हता/अनुभव व इतर आवश्यक कागदपत्रे आणि प्रमाणपत्रे अर्जासोबत स्वयंसाक्षांकित केलेल्या सुस्पष्ट छायांकित प्रती सादर करावयाची आहेत.

**६) अर्जात दिलेल्या प्रत्येक मुद्याची माहिती अचूक व सुसष्ट अक्षरात भरावी. एकदा अर्ज सादर करताना भरलेल्या माहितीत खाडाखोड करण्यात येवू नये. अर्ज सादर केल्यानंतर अर्जात कोणतेही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.**

७) **वयोमर्यादा** - वयाचा पुरावा म्हणून जन्म प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला/ माध्यमिक शालांत परिक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण दाखला इ.ची स्वसाक्षांकित केलेली सुस्पष्ट छायांकित प्रत अर्जासोबत जोडावी.

I. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजेच २०/०८/२०२५ रोजी उमेदवाराचे वय प्रत्येक कंत्राटी पदाकरीता जाहिरातीत विहित केलेल्या वयोमर्यादेत असणे आवश्यक आहे.

II. अराखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादा ३८ वर्ष व राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादा ४३ वर्ष राहील.

III. राष्ट्रीय आरोग्य अभियानात सद्यस्थितीत कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना वयोमर्यादा शिथिलक्षम राहील. तथापि, कागदपत्रे पडताळणी दरम्यान सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या कार्यालय प्रमुखांच्या स्वाक्षरीचे तशा आशयाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. HR Policy नुसार वयोमर्यादा खालीलप्रमाणे राहील.

The calculation of age for the contractual year shall be on date of publishing of advertisement.

(a) **Minimum Age:** No person shall be eligible for employment under National Health Mission, Maharashtra unless he/she has completed 18 years of age. (Annexure I- 2 & 3 NHM Circular dated 29.9.2018 & 28.05.2019)

**(b) Maximum Age for entry**: Maximum age for entry shall be (1) 69 years for MO MBBS and specialists (2) 64 years for Nursing and Paramedical Staff and (3) For remaining posts 38 years for open category and 43 years for reserved category candidates.

(c) No age bar for the employees already working under NHM and wish to apply for another post within NHM

(d) Applicants above 60 years are mandated to produce physical fitness certificate certified by civil surgeon (Annexure I- 2.NHM Circular dated 29.9.2018).

(e) All NHM employees should not have any administrative or financial proceedings, penal proceedings, criminal or any other type of serious crime against him during previous government service period. ( Annexure I- 2.NHM Circular dated 29.9.2018).

**Age limit for end of contractual service:**

(f) The age limit for end of contractual service shall be (1) 70 years for MO MBBS and specialists (2) 65 years for Nursing and Paramedical Staff and (3) 60 years for remaining posts. (Annexure I- 3.NHM Circular dated 28.05.2 019)

**८) अर्ज भरण्याबाबतच्या इतर सर्वसाधारण सुचना-**

अर्ज सादर करीत असतांना आवश्यक सर्व शैक्षणिक, अनुभव, जात इ. दाखले, प्रमाणपत्राच्या स्वयंसाक्षांकित सुस्पष्ठ छायांकित प्रती जोडाव्यात, अपूर्ण माहिती भरलेले व आवश्यक कागदपत्रे नसलेले अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत.

I. उमेदवारांस मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्यास मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

II. राखीव प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतर प्रवर्गातील उमेदवारांना तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल, त्यामुळे सर्व प्रवर्गातील पात्र उमेदवारांनी अर्ज सादर करावेत.

III. अर्ज करीत असणारी अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र, तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette) कागदपत्र यांची छायांकीत प्रत अर्जासोबत सादर करावी व आपण निवडीस पात्र झाल्यास पडताळणी दरम्यान मूळ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

IV. माध्यमिक शालांत परिक्षा (एस.एस.सी.) प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जन्म तारीखच अर्जात नमूद करावी.

V. अर्जात लिंग, वैवाहिक स्थिती याबाबतची माहिती अचूक नमूद करावी.

VI. अर्जामध्ये उमेदवाराने स्वतांचा वैध ई-मेल आयडी, चालू भ्रमणध्वनी क्रमांक व पर्यायी भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे. आवश्यकतेनुसार पात्र/अपात्र यादीमधील निवडीकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांना मूळ कागदपत्र पडताळणी संदर्भात देण्यात येणाऱ्या सूचनाई-मेलव्दारे देण्यात येतील, तसेच पात्र उमेदवारांपैकी गुणानुक्रमे निवडीस पात्र उमेदवारांची यादी संकेतस्थळावर देखील प्रसिद्ध करण्यात येईल. त्यामुळे ईमेल आयडी पदभरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत चालू राहतील व ईमेल वेळोवेळी तपासण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील. **तसेच कंत्राटी पदभरती बाबत पात्र/अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची यादी आणि कंत्राटी पदभरती बाबतच्या आवश्यक सूचनाव सुधारणा वेळोवेळी या कार्यालयाच्या https://www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येतील. याकरिता उमेदवाराने वेळोवेळी संकेतस्थळावर भेट देणे देखील बंधनकारक आहे.**

VII. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी आहे हे नमूद करणे आवश्यक आहे. त्याबाबतचे विहित प्रमाणपत्राची (Domicile Certificate) सुस्पष्ट छायांकित प्रत अर्जासोबत सादर करावी व आपण निवडीस पात्र झाल्यास छाननी दरम्यान मूळ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

VIII. उमेदवाराने आपला धर्म व जातीचा प्रवर्गाचा तपशील अचूकपणे नमूद करावा. उमेदवार राखीव प्रवर्गात मोडत असल्यास त्याबाबतचे विहित प्रमाणपत्राची सुस्पष्ट स्वछायांकित प्रत सादर करावे व आपण निवडीस पात्र झाल्यास छाननी दरम्यान मूळ प्रमाणपत्र सादर करावे. राखीव प्रवर्गाच्या उमेदवाराने जात प्रमाणपत्र सादर न केल्यास अशा उमेदवाराचे अर्ज विचारात घेतले जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

IX. इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक व सामाजिक शैक्षणिक मागास प्रवर्गात मोडणा-या उमेदवारांनी वैध उन्नत व प्रगत व्यक्ती/गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र सादर करावे व आपण निवडीस पात्र झाल्यास छाननी दरम्यान मूळ प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. अन्यथा प्रमाणपत्र सादर न केल्यास अशा उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात येतील.

X. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक व सामाजिक शैक्षणिक मागास प्रवर्गातून अर्ज करणा-या उमेदवाराने आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक प्रमाणपत्र (EWS Certificate) व सामाजिक शैक्षणिक मागास प्रमाणपत्र (SEBC Certificate) सादर करावे व आपण निवडीस पात्र झाल्यास छाननी दरम्यान मूळ प्रमाणपत्र सादर करावे,

XI. अर्जदाराने आपला सध्याचा पत्ता व कायमस्वरूपी पत्ता अचूक नमूद करावा.

**९) संगणक अर्हता व इतर** MSCIT प्रमाणपत्र धारण करीत असल्याचा त्याबाबतचा तपशील नमूद करुन जोडावा.

**१०) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र –**

I. शासनाच्या धोरणानुसार उमेदवारास लहान कुटुंब धोरणाचे पालन करणे आवश्यक राहील.

II. तसेच अर्जासोबत सदर लहान कुटुंब सुस्पष्ट छायांकित प्रमाणपत्र सादर करावे व उमेदवाराने आपण निवडीस पात्र झाल्यास छाननी दरम्यान लहान कुटुंब असल्याबाबतचे मूळ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

III. सदर लहान कुटुंबाचे प्रमाणपत्राचा नमुना अर्जा सोबत जोडला आहे.

**११) उमेदवाराचा फोटो व स्वाक्षरी-** उमेदवाराने अलीकडील काळात काढलेला सुस्पष्ट फोटो व स्वयंस्वाक्षरीसह अर्जासोबत सादर करावेत.

**१२) निवड प्रक्रिया -**

I. सदर कंत्राटी पदभरतीच्या अनुषंगाने निवड प्रक्रिया ठरविण्याचे सर्व अधिकार मा. उपायुक्त (सार्व. आरोग्य) तथा अध्यक्ष राष्ट्रीय आरोग्य अभियान, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

II. उमेदवारांची खालील निकषानुसार खालीलप्रमाणे गुणांकन तयार करण्यात येईल.

१) थेट मुलाखती – अतिविशेषतज्ञ, विशेषतज्ञ, वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस. ही पदे थेट मुलाखती घेऊन भरण्याकरिता खालीलप्रमाणे गुणांकन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

१ Subject Knowledge (१०)
२ Research & Academic Knowledge (१०)
३ Leadership Quality (१०)
४ Administrative Abilities (१०)
५ Experience (१०)

a) For Government Experience – २ marks for one year.

b) For Private Experience – १ marks for one year.

Total Experience – १० Marks maximum

२) गुणांकन पध्दती - उपरोक्त थेट मुलाखतीमधील पदांव्यतिरिक्त इतर सर्व पदांकरीता गुणांकन पध्दतीनुसार निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे राबविण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| अ | कंत्राटी पदाकरीता आवश्यक किमान शैक्षणिक अर्हता. | अंतिम वर्षातील एकूण प्राप्त गुणांच्या (टक्केवारीच्या प्रमाणात ५० गुण. |
| आ | कंत्राटी पदाकरीता आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अर्हता/पदव्युत्तर अर्हता. | अंतिम वर्षातील एकूण प्राप्त गुणांच्या (टक्केवारीच्या) प्रमाणात २० गुण. |
| इ | कंत्राटी पदाकरीता आवश्यक अनुभव | प्रत्येक वर्षाकरिता ६ गुण (कमाल ३० गुण) |
| | एकूण | १०० गुण |

III. उपरोक्त प्रमाणे गुणांकन यादी तयार केल्यानंतर उमेदवारांची निवड करण्यापूर्वी रिक्त पदांच्या संख्येनुसार ५०% या प्रमाणात उमेदवारांना मुळ कागदपत्रे पडताळणी करिता बोलविण्यात येईल,

IV. मूळ कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी गैरहजर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल व गुणांकन यादीतील पुढील पात्र उमेदवारास संधी देण्यात येईल.

V. मूळ कागदपत्रे पडताळणीच्या दिवशी गैरहजर अर्जदारास निवडीकरिता कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

VI. उपरोक्त निवड प्रक्रियेसंदर्भात मुद्दा क्र.1 अन्वये, आवश्यकतेनुसार प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडे राहतील.

**१३) सर्वसाधारण सुचना-**

I. उपलब्ध करुन देण्यात येणा-या नमुन्यामध्ये अर्ज उमेदवारांनी भरणे आवश्यक आहे.

II. राष्ट्रीय आरोग्य अभियान, राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम, १५ वा वित्त आयोग व हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना हे स्वतंत्र अभियान/कार्यक्रम आहेत. त्यामुळे राष्ट्रीय आरोग्य अभियान व राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम मध्ये कार्यरत कर्मचा-यांना देय असलेल्या सेवा व लाभ १५ वा वित्त आयोग व हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना मध्ये निवड झालेल्या कंत्राटी कर्मचा-यांना मिळणार नाहीत.

III. केंद्र/राज्य शासनाच्या मंजूरीनुसार कार्यक्रमांतर्गत अथवा अभियान अंतर्गत बदल झाल्यास परिस्थिती अनुरूप पदांची संख्या / आरक्षणात बदल होऊ शकतो.

IV. **पदभरतीकरिता विहित मुदतीत रजिस्टर टपालाने किंवा हस्तदेय अर्ज स्वीकारले जातील याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. ज्या उमेदवारांना रजिस्टर टपालाने अर्ज पाठवायचा असल्यास सदरचा अर्ज विहित मुदतीत म्हणजेच दि.२०/०८/२०२५ रोजी सांय. ५.०० वाजेपर्यंत प्राप्त होईल याची उमेदवारानी दक्षता घ्यावी. विहित मुदतीनंतर प्राप्त न झाल्यास किंवा कोणत्याही प्रकारे विलंब झाल्यास असे अर्ज स्वीकारण्यात किंवा विचारात घेतले जाणार नाहीत.**

V. सदर कंत्राटी पदभरती प्रक्रियेबाबतच्या सर्व आवश्यक सूचनाव माहिती महानगरपालिकेच्या https://www.mbmc.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमेदवारांनी https://www.mbmc.gov.in या संकेस्थळास वारंवार भेट देऊन माहिती प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहील, पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही.

VI. सदरची पदे ही प्रकल्प अंमलबजावणी आराखडयातील मंजूरीनुसार भरण्यात येतात त्यामुळे पीआयपीच्या मंजूरीनुसार पदांची संख्या व आरक्षणात बदल होणे अभिप्रेत असते. त्यामुळे जाहिरातीत नमूद केलेल्या रिक्त कंत्राटी पदांच्या संख्येत व आरक्षणामध्ये बदल होऊ शकतो.

VII. जाहिरातीत नमूद केलेली पदे ही पुर्णता कंत्राटी स्वरुपाची असून ती शासनाची नियमित पदे नाहीत. या पदांचा शासनाच्या पदांशी काहीही संबंध नसून उमेदवार राज्य शासनाच्या नियमित पदावर समायोजन करण्याची मागणी करु शकणार नाही.

VIII. जाहिरातीत नमूद केलेले कंत्राटी पदाचे मानधन हे एकत्रित ठोक मानधन आहे.

IX. जाहिरातीच्या अनुषंगाने कंत्राटी पदांकरीता अर्ज केलेल्या व नियुक्तीस पात्र ठरलेल्या उमेदवारांना आवश्यकतेनुसार रिक्त असलेल्या मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कोणत्याही आरोग्य संस्थेत पदस्थापना/नियुक्ती देण्यात येईल.

X. उमेदवारांच्या पदस्थापनेबाबतचे व पदभरतीतील सर्व अधिकार मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना राहतील.

XI. अर्ज करण्याची अंतिम तारीख कामकाजाच्या दिवशी दि. २०/०८/२०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत राहील. त्यानंतर प्राप्त झालेले अर्ज व कागदपत्रे, प्रमाणपत्रे पदभरती करिता ग्राह्य धरले जाणार नाही तसेच कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्ज व कागदपत्रे, प्रमाणपत्रे स्विकारण्याकरिता अर्जदारास कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

XII. सदर पदभरती प्रक्रियेत आवश्यकतेनुसार बदल करण्याचे व/वा सदर पदभरती अंशतः किंवा पूर्ण रद्द करण्याचे अधिकार मा. उपायुक्त (सार्व. आरोग्य) तथा अध्यक्ष राष्ट्रीय आरोग्य अभियान , मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

**(डॉ. प्रमोद पडवळ)**
**वैद्यकीय आरोग्य अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नुसार**
**अर्जासोबत जोडवयाचे लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना**

**प्रतिज्ञापत्र**

**नमुना अ**

**(नियम 4 पहा)**

मी श्री. श्रीमती/कुमारी ...............................................................................................

श्री. .................................................................................................................. यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय ........ वर्ष, राहणार, ..................................................... याद्वारे असे जाहिर करतो/करते की,

(1) मी ......................................................................................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(2) आज रोजी मला ........ (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक 23 जुलै, 2020 यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या............. आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा)

(3) दिनांक 23 जुलै, 2020 रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक 23 जुलै, 2020 व तद्‌नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

सही/-

ठिकाण:-

दिनांक:-

जाहिरात क्र. जा.क्र.मनपा/सार्व.आ.वि./ 229 /२०२५-२६ दिनांक:- २८/०७/२०२५

## अर्जाचा नमुना

**(अर्ज भरण्या अगोदर संपूर्ण जाहिरात वाचा)**

**अभियान/कार्यक्रमाचे नाव** (NHM/NTEP/१५TH FC-UAAM/HBT) : ........................................................

पदाचे नांव (जाहिरातीत नमूदनुसार) : ........................................................

प्रति,
मा.उपायुक्त तथा अध्यक्ष राष्ट्रीय आरोग्य अभियान,
मिरा भाईंदर महानगरपालिका

| उमेदवाराचे छायाचित्र (पासपोर्ट साईज) व खालील चौकोनात स्वाक्षरी |
|---|
| |

| (१) | उमेदवाराचे संपूर्ण नांव | : | मराठी | इंग्रजी (कॅपिटल लेटर) |
|---|---|---|---|---|
| १. | **आडनाव** | : | .............................. | .............................. |
| २. | **स्वत:चे नाव** | : | .............................. | .............................. |
| ३. | **वडिलांचे/ पतीचे नाव** | : | .............................. | .............................. |

(२) **पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता (पिन कोडसहित)** : **(कायमस्वरुपी)** **(सध्याचा)**

.............................. ..............................

.............................. ..............................

.............................. ..............................

**जिल्हा** .............................. ..............................

**राज्य** .............................. ..............................

**पिन कोड** .............................. ..............................

**संपर्कासाठी दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक** .................... /..................../....................

(३) **अ) जन्मतारीख** :

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

(४) ब) जाहिरात प्रसिध्द

झालेल्या दिनांक ........................वर्ष........................महिने............दिवस

रोजीचे वय

(५) लिंग :

(६) राष्ट्रीयत्व : भारतीय / अभारतीय

(७) अर्जदार महाराष्ट्राचा मूळ रहिवासी आहे काय ? : होय/नाही

(८) वैवहिक स्थिती (होय/नाही) :

(९) धर्म : ............................

(१०) उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानात कार्यरत आहे का? ( होय/नाही) : ...........................

(११) उमेदवाराचा जातीचा प्रवर्ग : ...........................

(१२) जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या संवर्गासाठी लागू असलेल्या चौकटीमध्ये (✓)अशी खुण करावी.

| अ.जा. | अ. ज. | वि.जा.(अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | सा. शै. मा.प्र. | आ.दु.घ. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

(१३) जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या संवर्गासाठी उमेदवाराचा स्वतःचा प्रवर्ग खालीलप्रमाणे लागू असलेल्या चौकटीमध्ये (✓)अशीखूण करावी.

| अ.जा. | अ. ज. | वि.जा.(अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | सा. शै. मा.प्र. | आ.दु.घ. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१४) | अवगत असणाऱ्या भाषा (योग्य ठिकाणी (✓) अशी खूण करावी.) | मराठी | हिंदी | इंग्रजी | अन्य ( उल्लेख करावा) |
| | | | | | |

(१५) शैक्षणिक अर्हता: (दहावी पासून चढत्या क्रमाने माहिती भरावी) (ग्रेड किंवा SGPA/CGPA नमूद करू नका, फक्त टक्केवारी नमूद करावी.)

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | मंडळ/विद्यापीठाचे नाव | परीक्षा प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

(१९) **आपणाविध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालू आहे काय ?**

| **होय** | **नाही** |
|---|---|
| | |

(२०)

| **अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **१)** | ............................ | **२)** | ......................................... | **३)** | ......................................... |
| **४)** | ............................ | **५)** | ......................................... | **६)** | ......................................... |
| **७)** | ............................ | **८)** | ......................................... | **९)** | ......................................... |

**मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.**

ठिकाण :-

दिनांक :- अर्जदाराची सही/-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(१६)

| अतिरिक्त शैक्षणिक अर्हता : | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(१७)

| संगणक अर्हता : (MSCIT किंवा मान्यता प्राप्त समकक्ष कोर्स) | प्राप्त गुण : |
|---|---|

(१८) अनुभव :

| संस्थेचे नाव, पत्ता व ज्या पदावर काम केले आहे ते पदनाम | शासकीय/ निमशासकीय/ खाजगी | कालावधी | | एकुण (वर्ष/महिना/दिवस) | सेवा सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**फौजदारी गुन्हा दाखल नसले बाबतचे**

**हमीपत्र**

मी. श्री/श्रीम./कुमारी .......................................................................... वय............ वर्ष. सध्या ..…......................... राहणार असे लिहुन देतो/देते की, या पत्यावर ..... वर्षापासुन आजपर्यंत राहत आहे.

तरी मी वास्तव्य करीत असलेल्या वरील नमूद कालावधीत माझे विरुध्द मी राहत असलेल्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनच्या आभिलेखावर काही एक दखलपात्र गुन्हा अथवा आक्षेपार्ह नोंदी नाही.

ठिकाण :-
दिनांक :-

अर्जदाराची सही